
# १८. आठवडी बाजार

• **ऐका. म्हणा.**



हा आमचा गाव.
ही आमच्या गावची टेकडी.
टेकडीच्या बाजूला ओढा आहे.
टेकडीच्या पायथ्याशी छोटेसे मैदान आहे.
तिथे आठवडी बाजार भरतो.
भाज्या विकणारे ओळीत बसतात.
सई आईबरोबर बाजारात गेली.
कांदे, बटाटे, टमाटे, पालक घेतला.
दोघी बाजारात फिरल्या.
फुले घेतली. फुगे घेतले.
पेढे घेतले.
दोघी घरी परत निघाल्या.

• **सांगा.**

(अ) तुमच्या गावात आठवडी बाजार भरतो का ? कोठे भरतो ?

(आ) तुम्ही आठवडी बाजारातून काय काय विकत आणता ?

• **पाहा. ऐका. म्हणा. वाचा.**


टेकडी


टमाटे


बटाटे


कांदे


पालक


पेढा


ओढा


ओळ


फुले


फुगे

• **जोडीतील शब्द ऐका. सारख्या अक्षरांखाली रेघ ओढा. रेघा ओढलेली अक्षरे वाचा.**

| | | | |
|---|---|---|---|
| घर – घरटे | छत – छत्री | खराटा – खडू | वही – वहिदा |
| टमाटे – बटाटे | फुले – फुगे | पेढा – ओढा | ओढा – ओळ |

- ऐका. म्हणा.

घ छ ख व टे फु ढा ओ

- पाहा. ऐका. समजून घ्या. वाचा.

| | | |
|---|---|---|
| ट | े | टे |
| घ | ा | घा |

| | | |
|---|---|---|
| ढ | ा | ढा |
| घ | ी | घी |

| | | |
|---|---|---|
| फ | ु | फु |
| घ | ु | घु |


| | | |
|---|---|---|
| घ | े | घे |

- पाहा. ऐका. म्हणा. वाचा.


खवा छान खेकडा घेवडा वाच वाढ वास ओढा खाडी वडी


वाहने फुगडी गुलाल एकटा नखे छाती थुईथुई छुमछुम छनछन घरघर खाडखाड

- चित्रे पाहा. नावे वाचा.


कढई


वाघ


वीट


थवा


मुलगी

- पाहा. ऐका. म्हणा. वाचा.


गुलाब


जाई


जास्वंद


चाफा


सदाफुली


शेवंती

- ऐका. म्हणा. शब्दांची गाडी तयार करा.

उदा., १. वास → सडक → कपाट → टप → पाऊस → सहल → लाडू

२. ओढा → ढाल → लसूण → नथ → थवा

३. एक → कडक → कान → नाक → कप → पाय → ये

- उपक्रम : आई किंवा वडिलांबरोबर आठवडी बाजारात फिरा. तेथे कोणकोणत्या वस्तू आहेत ते पाहा. विक्रेता–गिऱ्हाईक एकमेकांशी काय बोलतात, कसे बोलतात ते ऐका. बाजाराचे वर्णन वर्गात सांगा.

**शिक्षकांसाठी :** या पाठापर्यंत झालेल्या अक्षरांना ा, ी, ु, ू, े ही चिन्हे जोडून अक्षरे फलकावर लिहावी. वाचून दाखवावी. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावी. 'शब्दांची गाडी' हा खेळ समजावून सांगावा. हा खेळ वर्गात घ्यावा. विद्यार्थ्यांनी सांगितलेले शब्द फलकावर लिहावे. वाचून घ्यावे.

• शब्द–चित्र–शब्द यांच्या जोड्या लावा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चाफा |  | शेवंती | जास्वंद |  | सदाफुली |
| शेवंती |  | गुलाब | सदाफुली |  | जाई |
| गुलाब |  | चाफा | जाई |  | जास्वंद |

• पाहा. गिरवा. लिहा. वाचा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ट ........ | टा ........ | टी ........ | टु ........ | टू ........ | टे ........ |
| ढ ........ | ढा ........ | ढी ........ | ढु ........ | ढू ........ | ढे ........ |
| च ........ | चा ........ | ची ........ | चु ........ | चू ........ | चे ........ |
| छ ........ | छा ........ | छी ........ | छु ........ | छू ........ | छे ........ |
| घ ........ | घा ........ | घी ........ | घु ........ | घू ........ | घे ........ |
| ध ........ | धा ........ | धी ........ | धु ........ | धू ........ | धे ........ |

• वरील अक्षराने सुरुवात किंवा शेवट होणारे तुम्हांला माहीत असलेले शब्द सांगा.

8F67HG

• पाहा. समजून घ्या. वाचा.


फूल


फुले


फुगा फुगे


मुलगा


मुलगे

• वरील शब्द वापरून वाक्ये बनवा.

शिक्षकांसाठी : घ, ध, छ, व, क या अक्षरांना ा, ी, ु, ू, े ही चिन्हे जोडून वाचन व लेखनाचा सराव घ्यावा.